# <u>प्रेस नोट</u>

जावक क्रंमाक /२०१९ पुणे शहर दिनांक ०५/०९/२०१९

विषय :- बॉम्ब शोधक व नाशक पथक पुणे शहर कडून सार्वजनिक गणेशोत्सवच्या अनुषंगाने जनजागृती अभियान व घातपात विरोधी विशेष मोहिम राबविले बाबत.

------०००------

बॉम्ब शोधक व नाशक पथक पुणे शहर कार्यालयाकडून गणेशोत्सव – २०१९ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले आहेत.

१. बॉम्बशोधक व नाशक पथकांने जगजागृतीसाठी तयार केलेले स्लाईड शो खालील मोठया मंडळाच्या एलईडी वर दर १ तासाने दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

   १) श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, २) श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती देखावा मंदिर, ३) अखिल मंडई गणपती मंडळ, ४) कसबा गणपती मंडळ, ५) गुरुजी तालीम गणेश मंडळ, ६) तुळशीबाग गणेश मंडळ, ७) केसरी वाडा गणेश मंडळ

२. बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून पुणे शहरातील मानाचे तसेच गर्दीच्या गणपती मंडळाची घातपात विरोधी तपासणी करण्यात येत असून मंडाळाच्या पदाधिका-यांना बॉम्ब स्फोटच्या दृष्टिने लोकांनी घ्यावयाची काळजी बाबत सुचनाचे पत्रक देण्यात आले आहे.तसेच मंडळाच्या पदाधिका-यांना सदरच्या सुचना दर १५ मिनिटांनी त्यांचेकडील ध्वनिक्षेपक यंत्रणेद्वारे देण्या बाबत कळविण्यात आले आहे.

३. बॉम्ब शोधक व नाशक पथकाकडून खालील नमुद शाळा कॉलेजामध्ये जाऊन विद्यार्थ्यासाठी स्लाईड शो दाखवून व माहिती देऊन जनजागृती करुन त्यांचे प्रश्नाची उत्तरे देऊन मार्गदर्शन करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| मॉर्डन कॉलेज - ५ शिक्षक, २०० विद्यार्थी | एस.एम.जोशी कॉलेज १० शिक्षक, २५० विद्यार्थी |
| आर.आर.शिंदे ज्युनिअर कॉलेज, २ शिक्षक ४०० विद्यार्थी | गरवारे कॉलेज १ प्राचार्य, १५ शिक्षक, ६०० विद्यार्थी |
| रोझरी स्कुल कॅम्प २ शिक्षक, ४०० विद्यार्थी | एस.पी कॉलेज ४ शिक्षक, २०० विद्यार्थी |
| एस.एस.पी.एम.एस कॉलेज १ शिक्षक, १५० विद्यार्थी | नु.म.वि शाळा १ शिक्षक, ३०० विद्यार्थी |
| कृर्षी महाविद्यालय, शिवाजीनगर २०० विद्यार्थी | देसाई महाविद्यालय शनिवार पेठ १ शिक्षक, १५० विद्यार्थी |
| शासकीय इंजिनियरिंग कॉलेज २ शिक्षक, ५० विद्यार्थी | भारत इंग्लिश स्कूल शिवाजीनगर ३ शिक्षक २५० विद्यार्थी |

४. दिनांक २१/०८/२०१९ पासून मानाच्या, गर्दीच्या अशा एकुण प्रमुख ६८ गणपती मंडळाच्या मंडपाची व आजू बाजूच्या परिसराची तपासणी करण्यात आली आहे. दिनांक ०२/०९/२०१९ रोजी पासून पाच परिमंडळातील मानाच्या, गर्दीच्या तसेच इतर महत्त्वाच्या गणपती मंडळाच्या मंडपाची नियमितपणे तपासणी करण्यात येत असून मंडळाच्या पदाधिका-यांना ध्वनिक्षेपक यंत्रणेवरुन जनतेस सावधगिरीच्या सुचना देणे बाबत वारंवार सुचित करण्यात आले आहे.

कोणताही घातपात होऊ नये या करिता महत्त्वाच्या गणपती मंडळाची आधिकचे मनुष्यबळ वापरुन विशेष तपासणी मोहिम आखण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

सही /-
पोलीस उप आयुक्त
विशेष शाखा – १ , पुणे शहर.